# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंती निमित्त **रविवार दिनांक 05 मे, 2019 रो**जी सकाळी 10–30 वाजता अतिथीगृहासमोरील पुतळयास तसेच सकाळी 10–45 वाजता विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयाचे इमारतीमधील पोर्चमध्ये डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेस मा. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित केला आहे. तरी या समारंभास विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींनी उपस्थित रहावे. ही विनंती

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी भवन/301 — अधीक्षक
दिनांक : 29/04/2019 — विद्यार्थी भवन

प्रति :

1. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी/विद्यार्थ्यीनी यांना या समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
2. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
3. सर्व रेक्टर्स यांनी वस्तिगृहातील नोटीस बोर्डावर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्याना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सुचना द्याव्यात.
4. सहा. अधीक्षक, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांनी हे परिपत्रक नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.
5. अभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सुचना सर्व संबंधितांना द्यावी.
   अ) मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये डॉ. आप्पासाहेब पवार यांची प्रतिमा उपलब्ध करून देणेबाबत.
   ब) माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचे पुतळयाच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याबाबत.
   क) माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या अतिथीगृह येथील पुतळयास सकाळी 10.30 वाजता मा. कुलगुरूसो यांचे शुभहस्ते पुष्पहार घालणेत येणार आहे. तरी त्यासाठी पुतळयाच्या ठिकाणी शिडीची व्यवस्था करावी.
   ड) कार्यक्रमाचे ठिकाणी तसेच मुख्य इमारतीमधील समोरील पोर्चची स्वच्छता ठेवणेबाबत. तसेच डॉ. आप्पासाहेब पवार यांचे पुतळा परिसरात स्वच्छता ठेवण्याची व्यवस्था करण्याबाबत.
6. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या ठिकाणी कुंडया ठेवाव्यात तसेच कार्यसुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी.
7. श्री. बी. व्ही. मिसाळ शिपाई यांनी दोन पुष्पहार, फुले व पुजा साहित्य यांची व्यवस्था करावी.
8. श्री. प्रकाश चौगुले, जमादार व श्री. ए. जी. सावंत, जमादार यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक टेबल, स्टुल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्या वेळी एक शिपाई या विद्यार्थी भवनच्या शिपायास मदतीस देणेत यावा अथवा स्वतः उपस्थित रहावयाचे आहे.
9. श्री. रमेश गवळी, अधीक्षक, परीक्षा भवन विभाग यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी रांगोळीची व्यवस्था करावी.
10. भांडार विभागप्रमुखांनी कार्यक्रमासाठी इस्त्रीचे पांढरेशुभ्र स्वच्छ टेबल क्लॉथ पुरविण्याची व्यवस्था करावी.
11. वाहन विभागप्रमुखानी हार, फुले व पुजा साहित्य आणणेसाठी आदल्या दिवशी विद्यार्थी भवनास वाहन उपलब्ध करून दयावे.
12. मा. सचिव, डॉ. आप्पासाहेब पवार " कमवा आणि शिका " प्रबोधिनी यांनी कार्यक्रमाची सूचना प्रबोधिनीच्या इतर सदस्यांना देणेची आहे.